# मुंबई शहरच ॲक्वा लाईन मेट्रोची प्रेरणा

## एमएमआरसीएलकडून मेट्रो डब्यांचे अनावरण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाचे डबे हे कधीही न झोपणाऱ्या मुंबई शहराच्या प्रेरणेतून तयार करण्यात आले असल्याचे एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गासाठी आवश्यक मेट्रो डब्यांच्या प्रतीकात्मक रचनांचे सादरीकरण मुख्यमंत्र्यांसमोर करण्यात आले. या वेळेस या ॲक्वा लाईन मेट्रो रेल्वे डब्यांचा फर्स्ट लूक जाहीर करण्यात आला.

मुंबईच्या स्पिरिटला सलाम करीत मुंबईतील समुद्राचे शांत, संयमी स्वरूपाचे नियोजन ॲक्वा लाईन मेट्रो ३ च्या डब्यांमध्ये आहे. या डब्यांची रंगसंगती आणि हरित पर्यावरणपूरक आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव हे या डब्यांचे वैशिष्ट्य असणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गाची मेट्रो ८ डब्यांची असून ३१ ट्रेन २०२० पर्यंत दाखल होणार असल्याचे एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले आहे. ३३.५ किमी मार्गावर धावणारी ही मेट्रो मिठी नदीखालूनही जाणार असून सुरुवातीला ड्रायव्हरलेस असणाऱ्या मेट्रोमध्ये मेट्रोचे पायलट असणार असल्याचे सांगण्यात आले आहे. २०२१ पर्यंत ही मार्गिका सुरू करण्यासाठी एमएमआरसीएलचे प्रयत्न असून दिवसभरात जवळपास १५ लाख प्रवासी प्रवास करतील, असे सांगण्यात आले आहे.

### वैशिष्ट्ये

**८ डबे, ड्रायव्हरलेस मेट्रो, ३०० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता, एसी, एलसीडी स्क्रीन्स, डिजिटल मॅप इंडिकेटर, स्मोक डिटेक्टर, फायर एक्सिटिंग्युशर, वॉईस कम्युनिकेटर्स, व्हीलचेअर एरिया.**